Science

महाराष्ट्र शासन

क्र. संकिर्ण १०९६/अनु./(५७८/९६)/मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ मार्च, २०००

प्रति,
शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
पुणे.

विषय : महिला महाविद्यालयांना विद्यार्थी संख्येचा निकष शिथिल करुन अनुदान मंजूर करण्याबाबत..

संदर्भ : क्र. एनजीसी १९९६/३१७४६/विद्याशाखा/मवि-१, दि. १९.५.९८ चे अ.शा.पत्र.

महोदय,

राज्यातील काही महिला महाविद्यालये त्यांच्याकडून चालविण्यात येणा-या संबंधित विद्याशाखेमध्ये विद्यार्थी संख्येचा निर्धारित पूर्ण करीत नसल्याने अनुदानास पात्र ठरलेली नसून अशा महिला महाविद्यालयांच्या संबंधित विद्याशाखांना विद्यार्थी संख्येचा निकष शिथिल करुन अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव संदर्भाधिन दिनांक १९.५.९८ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

२. आपल्या संचालनालयाने प्रस्तावित केलेल्या ११ महिला महाविद्यालयांना (सोबत यादी जोडली आहे.) त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या विद्याशाखेस यापुढे निर्धारित विद्यार्थी संख्येचे निकष पूर्ण होतील, या अटीवर शासन निर्णय क्र. एनजीसी २०९१/(३५६७)/विशि-१अ, दिनांक ८ ऑगस्ट, १९९१ च्या परिच्छेद क्र. ३ मधील अट शिथिल करुन व नवीन महिला महाविद्यालयाला लागू असणा-या दिनांक ४.१.१९८९ च्या शासन निर्णयातील अनुदान सूत्रानुसार संबंधित विद्याशाखेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात यावे.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही पूर्तता अहवाल शासनास सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(म. अ. सरपोतदार)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -
१) सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, कोल्हापूर.
२) संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य (सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे)
३) निवड नस्ती/मशि-३

TRUE COPY

PRINCIPAL
SHARDABAI PAWAR MAHILA COLLEGE
SHARDANAGAR, BARAMATI